
# स्वादुपिंडाच्या दुर्मिळ आजाराने त्रस्त १३ वर्षांच्या मुलीला जीवदान

## सांगलीतील मुलीवर मुंबईत यशस्वी शस्त्रक्रिया

मुंबई, ता. ९ : स्वादुपिंडाच्या दुर्मिळ आजाराने पीडित सांगलीतील १३ वर्षीय मुलीवर उपचार करण्यात डॉक्टरांना यश आले आहे. जनुकीय स्थितीमुळे मुलीला हा त्रास झाला होता. स्वादुपिंडाचा स्यूडोसिस्ट विकसित झाला होता.

स्वादुपिंडाचा दाह असलेल्या १० लाख मुलांपैकी एका मुलामध्ये स्वादुपिंडाचा दाह असलेल्या स्यूडोएन्युरिझमची ही दुर्मिळ गुंतागुंत दिसून येते. लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे डॉ. राजीव रेडकर (बालरोग शल्यचिकित्सक) यांच्या नेतृत्वाखालील डॉ. अनिरुद्ध फडके (गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट), डॉ. दीपक उगरा (बालरोगतज्ज्ञ), डॉ. राहुल शेठ (इंटरव्हेंशनल रेडिओलॉजिस्ट), मिन्हाज शेख (बालरोगतज्ज्ञ) या तज्ज्ञांच्या टीमने प्रसंगावधान राखत दुर्मिळ अशा विकारावर



**मुंबई :** आपल्या आईसोबत तेरावर्षीय अदिती कांबळे

यशस्वीपणे उपचार करून मुलीला नवे आयुष्य दिले.

रुग्ण अदिती कांबळेला एक आठवड्यापासून तीव्र पोटदुखी होती. स्वादुपिंडाच्या आजाराचा कौटुंबिक इतिहास असलेल्या या रुग्णाला दोन वर्षांपूर्वी स्वादुपिंडाला सूज आल्याचे निदान झाले होते. तिच्या कुटुंबीयांनी गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टचा सल्ला घेतला, परंतु तिच्या तब्येतीत फारशी सुधारणा झाली नाही. गेल्या आठवड्यात तिला उलट्यांसह ओटीपोटात तीव्र वेदना झाल्या.

बालरोग सर्जन डॉ. राजीव रेडकर म्हणाले की, रुग्णाला ओटीपोटात असह्य वेदना होत होत्या. तिच्या ओटीपोटाच्या सीटी स्कॅनमध्ये स्यूडोसिस्ट (स्वादुपिंडावर द्रवपदार्थाने भरलेली गाठ) आणि स्यूडोसिस्टच्या आत गॅस्ट्रो-ड्युओडेनल धमनीचा स्यूडो-एन्युरिझम (धमनीस दुखापत झाल्याने रक्तस्राव) अशी गंभीर स्थिती निर्माण झाली. विशेषतः लहान मुलांमध्ये ही स्थिती सहसा दुर्मिळ आहे. तिच्या वडिलांना यापूर्वी स्वादुपिंडाच्या आजाराने ग्रासले होते आणि रुग्णालाही आनुवंशिक कारणांमुळे हा त्रास झाला. आता रुग्णाची प्रकृती उत्तम आहे.